**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०९ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अंगोला भेटीत संरक्षण, मत्सव्यवसाय, आदी विषयांवर सामंजस्य करार.**
2. **पुण्यातल्या कोरेगाव पार्क आणि बोपोडी जमीन व्यवहार प्रकरणांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे.**
3. **नागपूरच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय तर्फे "तेल आणि वायू क्षेत्रातील अग्निसुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन" या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचं आयोजन.**
4. **१२ ते १५ नोव्हेंबर दरम्यान अमरावतीत रंगणार महावितरण कंपनीच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचा उत्साह.**

**राष्ट्रपती अंगोला दौरा**

अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ लॉरेन्को आणि भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यात लुआंडा येथील राष्ट्रपती भवनात आज द्विपक्षीय चर्चा पूर्ण झाली. त्यासंदर्भात मत्सव्यवसाय, संरक्षण आदी विषयांशी संबंधित सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तत्पूर्वी, राष्ट्रपती मुर्मू यांचं सन्मानपूर्वक औपचारिक स्वागत करण्यात आलं. भारत -अंगोला द्विपक्षीय संबंधांना ४० वर्षं होत असून आतापर्यंतची भारतीय राष्ट्रपतींची ही पहिलीच अंगोला भेट आहे.

**पंतप्रधान**

उत्तराखंड राज्याचा आज २५वा स्थापना दिवस आहे. स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत देहरादून इथं विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, या कार्यक्रमात पंतप्रधानांनी विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन, उत्तराखंडमधल्या आठ हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमीपूजन आणि उद्घघाटन केलं. तसंच प्रधानमंत्री पीकविमा योजनेतून २८ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६२ हजार कोटी रुपये हस्तांतरित केले.

**जमीन व्यवहार प्रकरण**

उपमुख्यमंत्री अजित पवारांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या कोरेगाव पार्क आणि बोपोडी येथील जमीन व्यवहार प्रकरणांतील कुलमुख्त्यारधारक शीतल किसनचंद तेजवानी हिने परदेशात पलायन केल्याची चर्चा आहे. मात्र, तेजवानी पसार झाल्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दुजोरा दिलेला नाही. या दोन्ही प्रकरणांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. कोरेगाव पार्क येथील जमीन व्यवहार प्रकरणात बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पार्थ पवार यांच्या 'अमोडिया' कंपनीचा बोपोडीतील आणखी एक जमीन व्यवहार उघडकीस आला. बोपोडी आणि कोरेगाव पार्क या दोन्ही प्रकरणांत तेजवानी हिच्या विरुद्ध गुन्हे दाखल झाले असून  पोलीस तिचा शोध घेत आहेत.

**उद्धव ठाकरे गट**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव ठाकरे गटाने ४० स्टार प्रचारकांची यादी राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केली आहे. या यादीत उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यासह अभिनेते, मराठा चेहरे आणि आक्रमक नेते यांचा समावेश आहे. नगरपालिका-नगरपंचायत निवडणुकांत ठाकरे गटाला कमीतकमी १५० हून अधिक जागा मिळवून देण्याचं लक्ष्य ठरवण्यात आलं आहे.

**अग्निशमन**

केन्द्रीय गृह मंत्रालयांतर्गत येणा-या नागपूरच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय तर्फे "तेल आणि वायू क्षेत्रातील अग्निसुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन" या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचं आयोजन दिनांक 10 आणि 11 नोव्हेंबर रोजी करण्यात आलं आहे.पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या तेल उद्योग सुरक्षा संचालनालय यांच्या सहकार्याने होणा-या या कार्यशाळेत देशभरातील राष्ट्रीय तेल कंपन्या, नियामक संस्था, राज्य अग्निशमन सेवा आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा यांचे 100 हून अधिक प्रतिनिधी आणि 20 विषय तज्ञ सहभागी होणार आहेत. NFSC च्या सभागृहात होणा-या या कार्यशाळेला गृह मंत्रालयाचे अग्निशमन सेवा, नागरी संरक्षण आणि गृहरक्षक दलाचे महासंचालक सुनील कुमार झा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दोन दिवसांच्या या कार्यशाळेत अपस्ट्रीम, मिडस्ट्रीम आणि डाउनस्ट्रीम ऑपरेशन्समधील अग्निसुरक्षा, आपत्कालीन तयारी आणि जोखीम व्यवस्थापनावर तांत्रिक सत्रे आणि पॅनेल चर्चा घेण्यात येणार आहेत.

**बिहार विधानसभा**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस होता. दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघासाठी ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. १ हजार ३०२ उमेदवार रिंगणात उतरले असून तीन कोटी सत्तर लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. १४ नोव्हेंबरला बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. दरम्यान, मतदानाच्या पहिल्या टप्प्यात व्हीव्हीपॅट पावत्या उघड्यावर आढळल्याप्रकरणी सहायक निवडणूक अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आलं आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

**महावितरण**

महावितरण कंपनीच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडा संकुलात दिनांक १२ ते १५ नोव्हेंबर दरम्यान करण्यात आलं आहे. या स्पर्धेत १६ परिमंडलातील १ हजार १६० खेळाडू आठ संघाच्या माध्यमातून सहभागी होणार आहेत. वीज कर्मचाऱ्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव देण्यासाठी महावितरणमध्ये दरवर्षी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचं आयोजन करण्यात येते. यंदाच्या स्पर्धेचं यजमानपद अमरावती परिमंडलाकडे आहे. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन बुधवार दिनांक १२ नोव्हेम्बर रोजी महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते होणार आहे.

**आविष्कार स्पर्धा**

समाजाच्या गरजा ओळखून त्याप्रमाणे नवनवीन संशोधन व्हावे तसेच पदवी पासूनच विध्यार्थ्यांना संशोधनाची आवड निर्माण करणे आणि त्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रात दरवर्षी आविष्कार स्पर्धेच आयोजन करण्यात येतं. ऐकुया हा विशेष रिपोर्ट -

***अविष्कार ही संशोधन स्पर्धा एकूण सहा विषय गटामध्ये व पदवी ते संशोधक विद्यार्थी अश्या तीन स्तरांमध्ये आयोजित केली जात असून या स्पर्धेचे वैशिष्ट म्हणजे कुठलाही विध्यार्थी कुठल्याही गटात सहभागी होऊ शकतो. दरवर्षी विद्यापीठ स्तरीय आविष्कार महोत्सव आयोजित करण्यात येत असतो. यामध्ये महाविद्यालय स्तरावरील विद्यार्थी प्रथम जिल्हा स्तरावर व तेथून निवड झालेले विद्यार्थी, विद्यापीठ स्तरावर सहभागी होत असतात. यातून निवडलेल्या ४८ उत्कृष्ट प्रकल्पांचा विद्यापीठाच्या चमूमध्ये समावेश होऊन ते विद्यार्थी राज्यस्तरीय अंतर विद्यापीठ महोत्सवामध्ये प्रतिनिधित्व करीत असतात. विद्यापीठ अविष्कार स्पर्धेनंतर राज्यस्तरीय स्पर्धा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी इथं दिनांक १२ ते १५ जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहे.***

**बांगलादेश**

राजधानी ढाकामध्ये काल पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर समन्वित सुरक्षा सराव केला. माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या बरखास्त झालेल्या अवामी लीग पक्षाने १३ नोव्हेंबर रोजी प्रस्तावित केलेल्या 'ढाका लॉकडाऊन' कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर हा सराव करण्यात आला.अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्या घराबाहेरही मोठ्या प्रमाणावर पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

**टेनिस**

सर्बियाचा टेनिसपटू नोव्हाक जोकोविच यानं एटीपी २५० अथेन्स गटाचं विजेतेपद पटकावल्यानंतर तासाभरातच खांद्याच्या दुखापतीमुळे एटीपी अंतिम फेरीतून माघार घेतली आहे. हंगामातली ही शेवटची फेरी असून ती चुकण्याचं त्याचं हे सलग दुसरं वर्ष आहे. जोकोविचनं अथेन्स स्पर्धेत लॉरेन्झो मुसेटी याच्यावर ४-६, ६-३, ७-५ अशी मात करून आपल्या कारकीर्दीतलं १०१ वं, तर हार्डकोर्टवरचं ७२ वं विजेतेपद पटकावलं आणि हार्डकोर्टवर सर्वाधिक विजेतेपदांचा रॉजर फेडरर याचा विक्रम मोडीत काढला.

**हवामान**

राज्याच्या विविध भागांमध्ये थंडीची जाणीव होऊ लागली आहे. वातावरणातील आर्द्रता कमी झाल्याने आणि पावसासाठी अनुकूल परिस्थिती निवळल्याने तापमानात झपाट्याने घट होत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसांत गारठा आणखी वाढेल आणि थंडी टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्य व्यापेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यात सध्या कोरड्या हवेचा प्रभाव असून, त्यामुळे आकाश मुख्यतः स्वच्छ राहील. पण सकाळ-संध्याकाळ तापमानात घट दिसून येईल. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या भागात किमान तापमान 12 ते 15 अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाणार आहे.

******